**नियमित फौजदारी खटला क्र. ११/२०२४**
**महा. शासन वि. अमोल रामचंद्र पोवार**
**निशान क्रमांक- १७/क**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक- ३ ची जबानी)**
मी देवाशपथ खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | दिपाली सुनिल साबळे |
| वय | - | ४० वर्षे |
| व्यवसाय | - | शेती |
| पत्ता | - | तुरंबे, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**शासनातर्फे सरतपासणी विशेष सरकारी अभीयोक्ता श्री. एस. बी. कांबळे यांचे तर्फे शपथेवर पुढे सुरु -**

**१.** आरोपी क्र. २ हे माझे चुलते असून आरोपी क्र. १ हा माझा चुलत भाऊ आहे. फिर्यादी हा माझा भाऊ आहे. आरोपी यांनी मला व माझे परिवारास मारहाण केलेली नाही.

**साक्षीदाराने अभीयोग पक्षास सहकार्य न केलेने विशेष सरकारी अभीयोक्ता एस. बी. कांबळे यांनी साक्षीदारास उलटतपासणीत विचारले जाणारे सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. २१/०७/२०२३ रोजी सायंकाळी ५:३० चे सुमारास आम्ही घरी असताना भांडणाचा आवाज ऐकू आल्याने काय झाले बघण्यासाठी आम्ही गेलो असता असता आरोपी हे माझ्या भावाला वाईटवंगाळ शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील भांडण सोडवण्यासाठी गेलो असता आरोपी क्र. १ ने त्याच्या हातातील काठी वडीलांच्या डावे पायावर मारली व पाठीत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा मी व आई हे त्यांना सोडवण्या करिता आले असता आरोपी क्र. १ ने माझ्या डाव्या हातावर काठी मारून आम्हाला वाईटवंगाळ शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, गावातील मंडळींनी आमचे भांडण सोडविले. हे म्हणणे खरे आहे की,

माझी व आरोपींची कोर्टाबाहेर आपआपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मदत करण्यासाठी आज रोजी मी कोर्टात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस. आर. भांदिगरे वकील यांनी नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी.

दि. ०६/०३/२०२६

Sd/-

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

(न्यायालय क्र. २), राधानगरी